प्रेसनोट                                                    दिनांक ०१/०५/२०२५

**रईस हायस्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, भिवंडी येथील मुख्याध्यापक व शिक्षक यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्याबाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :– | ठाणे |
| तक्रारदार | :– | पुरुष, वय– ५५ वर्षे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | **१) शहाजान मोहम्मदअली मौलाना, वय – ५४ वर्षे, पद– शिक्षक, रईस हायस्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, भिवंडी, (वर्ग–३)**<br>**२) जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी, वय – ५२ वर्षे, पद– मुख्याध्यापक, रईस हायस्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, भिवंडी, (वर्ग–२)** |
| तक्रार प्राप्त दिनांक | :– | दि. १९/०३/२०२५ |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | दि. २०/०३/२०२५ व दि. २१/०३/२०२५ रोजीचे पडताळणी कारवाई मध्ये ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्यांचे मान्य केल्याचे निष्पन्न. |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | दि. ०१/०५/२०२५ रोजी ६०,०००/– रुपये आलोसे क्र. १ यांनी स्वीकारले. |
| थोडक्यात हकीकत | :– | तक्रारदार यांचे डुप्लीकेट सर्व्हीस बुक तयार करुन घेवून व त्यावर वेतन आयोगानुसार नोंदी व शिक्के घेवून देण्याकरीता यातील लोकसेवक शहाजान मोहम्मदअली मौलाना व लोकसेवक जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी हे तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत यातील तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. १९/०३/२०२५ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.<br>दिनांक २०/०३/२०२५ रोजी व दिनांक २१/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान यातील लोकसेवक १) शहाजान मोहम्मदअली मौलाना, पद– शिक्षक यांनी तक्रारदार यांचे डुप्लीकेट सर्व्हीस बुक तयार करुन घेवून व त्यावर वेतन आयोगानुसार नोंदी व शिक्के घेवून देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रू. लाचेची मागणी करुन त्यास लोकसेवक २) जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी, पद– मुख्याध्यापक यांनी लोकसेवक शहाजान मोहम्मदअली मौलाना यांनी वरील प्रमाणे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेस दुजारा देवून सदरची लाच रक्कम देण्याकरीता तक्रारदार यांना प्रोत्साहीत केले व यातील लोकसेवक शहाजान मोहम्मदअली मौलाना यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याबाबत पडताळणी कारवाईत निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दि.३०/०४/२०२५ रोजी आलोसे शहाजान मोहम्मदअली मौलाना यांनी तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयामध्ये समक्ष बोलावून घेवून पडताळणी दरम्यान मागणी केलेली रु.५०,०००/– लाचेची रक्कम तसेच सर्व्हीस बुक मधील नोंदी घेण्यासाठी खाजगी टायपीस्ट यांचेसाठी रु.५,०००/– व वेतना आयोगानुसार सर्व्हीस बुकवर शिक्के मारुन घेण्याकरीता रु.५,०००/– असे १०,०००/– रुपये अतिरिक्त आणण्यास सांगून असे एकूण ६०,०००/– रुपयांची मागणी करीत असल्याचे व सदरची रक्कम दि.०१/०५/२०२५ रोजी सकाळी घेवून येण्याबाबत कळविले असल्याचे सांगितले.<br>त्याप्रमाणे दिनांक ०१/०५/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक **१) शहाजान मोहम्मदअली मौलाना, पद– शिक्षक** यांना तक्रारदार यांचेकडून ६०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले असून लोकसेवक **२) जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी, पद– मुख्याध्यापक,** यांना ही ताब्यात घेण्यात आले आहे. वर नमूद दोन्ही लोकसेवक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी** – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२. मा. श्री. संजय गोवीलकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

Scanned with CamScanner

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांनेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in, Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी कमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसॲप्स् कमांक – ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

( अनुपमा खरे )
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करपशन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner